# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


प्रवेश सूचना

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/१०३८

दिनांक : 23 AUG 2017

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी , औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी संस्थास्तरावरील प्रवेश फेरीत सहभागी होणा-या उमेदवारांसाठी सूचना

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१७/९८०, दिनांक ११.८.२०१७

संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी , औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानीत, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था यांनी संस्थास्तरावरील रिक्त जागा भरण्यासाठी दिनांक २६.८.२०१७ ते २८.८.२०१७ या कालावधीत प्रवेश फेरी आयोजित करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार सर्व संस्थांमधील रिक्त जागा भरण्यासाठी दिनांक २६.८.२०१७ ते २८.८.२०१७ या कालावधीत संस्थानिहाय वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

सदर प्रवेशासाठी आजपर्यंत प्रवेश झालेले , प्रवेश न झालेले, अगेन्सट कॅप किंवा संस्थास्तरावरील प्रवेशासाठी नोंदणी केलेले असे सर्व उमेदवार पात्र आहेत.

तसेच जे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून TFWS प्रवर्गात प्रवेशित झालेले असतील तर ते उमेदवारही या संस्थास्तरावरील प्रवेशासाठी पात्र आहेत. मात्र ज्या संस्थांमध्ये TFWS प्रवर्गातील उमेदवार अन्य संस्थेत प्रवेश घेतील त्या संस्थांना सदर रिक्त झालेल्या TFWS प्रवर्गातील जागा संस्थास्तरावर भरता येणार नाहीत.

वरील सूचनांचे सर्व प्रवेशोच्छुक उमेदवार, संस्था आणि संबंधित घटकांनी नोंद घ्यावी.

( दयानंद मेश्राम)

सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी